## महाराष्ट्र शासन

क्रमांक :- सनित- १६२५/ प्र.क्र.९०/१३स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ३० सप्टेंबर, २०२५.

संदर्भ- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन आदेश दि. २०/०८/२०२५.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते.

राज्यातील अनेक जिल्हयातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमुद केलेल्या "अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक संदर्भित आदेशान्वये आदेशाच्या दिनांकापासून ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

महसुल व वन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार राज्यातील बहुतांश भागात अतिवृष्टीमुळे जनजीवन तसेच वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. विशेषत: राज्यातील ३२ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या १०० टक्के पेक्षा जास्त पर्जन्यमान झालेले असून त्यापैकी १२ जिल्ह्यात सरासरीच्या २०० टक्के पेक्षा जास्त व इतर ९ जिल्ह्यात १५० टक्के पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

उपरोक्त परिस्थितीमुळे अशा जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था व जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. ही परिस्थिती पुर्वपदावर येण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामुळे, सद्य:परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया सुरु असलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पाडणे शक्य होणार नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार पावसाळ्याच्या हंगामात सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याबाबत शासनास अधिकार आहे. ही बाब विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

राज्यात सद्यस्थितीत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेले जनजीवन व वाहतूक व्यवस्था पूर्वपदावर येण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन ज्या प्रकरणी मा. सर्वोच्च/ मा. उच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी

Scanned with OKEN Scanner

संस्थांच्या निवडणूका (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) या आदेशाच्या दिनांकापासून ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

तथापि, सदर आदेशातून खालील बाबींना सुट देण्यात येत आहे.

१. संस्थेच्या निवडणूकीनंतर पहिली पदाधिकारी निवड करणे.

२. चेअरमन/ व्हा. चेअरमन/ अन्य पदाधिकारी पदाचा राजीनामा दिल्यास अथवा मृत्यु/ अनर्हता या कारणांमुळे रिक्त झालेले चेअरमन/ व्हा. चेअरमन/ अन्य पदाधिकारी यांची निवड करणे.

३. राजीनामा/ मृत्यु/ अनर्हता या कारणांमुळे संचालक मंडळातील रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकाची स्वीकृतीने निवड करणे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संतोष पाटील)
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. विभागीय सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक/ उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. निवडनस्ती, कार्यासन १३-स



Scanned with OKEN Scanner

१८

# महाराष्ट्र शासन

सनित-१६२५/प्र.क्र.९०/१३-स
सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि:- २० ऑगस्ट, २०२५

संदर्भ- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे जा.क्र. रासनिप्रा/ कक्ष ११ / प्रलंबित निवडणुका, दि. २५/०७/२०२५ रोजीचे पत्र.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे यांच्या कार्यालयाकडून दि. २५/०७/२०२५ रोजी शासनास प्राप्त झालेल्या अहवालानुसार सध्या निवडणूक प्रक्रिया सुरु असणा-या सहकारी संस्थांची एकूण संख्या ३,१८८ असुन त्यापैकी 'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांची संख्या २८५ आहे.

महसूल व वन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दि. १८/०८/२०२५ अखेर राज्यातील ३० जिल्ह्यात सरासरीच्या ८० टक्केपेक्षा जास्त पाऊस झाला असून त्यापैकी १५ जिल्हयात सरासरीच्या १००% पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. त्यामुळे राज्यातील बहुतेक जिल्ह्यातील शेतकरी खरीप हंगामातील शेतीविषयक कामात व्यस्त असल्याने अशा शेतक-यांना ते सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया पावसाचा हंगाम पुर्ण होईपर्यंत (३० सप्टेंबर, २०२५) पुढे ढकलणे उचित होईल अशी शासनाची धारणा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार पावसाळ्याच्या हंगामात सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याबाबत शासनास अधिकार आहे. सबब, उपरोक्त नमूद केलेल्या कारणास्तव शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

राज्यातील अनेक जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती विचारात घेऊन ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुक प्रक्रीयेतील चिन्ह वाटपाचा टप्पा पुर्ण झाला आहे अशा संस्था, निवडणूक प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पहिली पदाधिकारी निवडणूक प्रक्रिया प्रलंबीत आहे अशा संस्था तसेच ज्या प्रकरणी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत मा. उच्च न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत अशा संस्था वगळून महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ मधील

Scanned with OKEN Scanner

नियम ४ मध्ये नमूद केलेल्या 'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक या आदेशाच्या दिनांकापासुन सध्या ज्या टप्प्यावर आहे त्या टप्प्यावर दि. ३०/०९/२०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक २०२५०८२०१०४०४८१८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=ca78467bcc4594e1e11741a7962a7a83feafb1764425750
37160fc343c4ae5ab, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA616740
9EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2025.08.20 10:42:24 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव**
**महाराष्ट्र शासन**

प्रत, योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे.
३. विभागीय सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक/ उपनिबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था(सर्व).
४. निवडनस्ती, कार्यासन १३ -स.

प्रत, माहितीस्तव :-

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र शासन

**क्रमांक :- सनित- १६२५/ प्र.क्र.९०/१३स,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
मंत्रालय, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग,१
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ३० सप्टेंबर, २०२५.

संदर्भ- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन आदेश दि. २०/०८/२०२५.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते.

राज्यातील अनेक जिल्हयातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमुद केलेल्या "अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक संदर्भित आदेशान्वये आदेशाच्या दिनांकापासून ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

महसुल व वन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार राज्यातील बहुतांश भागात अतिवृष्टीमुळे जनजीवन तसेच वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. विशेषत: राज्यातील ३२ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या १०० टक्के पेक्षा जास्त पर्जन्यमान झालेले असून त्यापैकी १२ जिल्ह्यात सरासरीच्या २०० टक्के पेक्षा जास्त व इतर ९ जिल्ह्यात १५० टक्के पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

उपरोक्त परिस्थितीमुळे अशा जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था व जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. ही परिस्थिती पुर्वपदावर येण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामुळे, सद्य:परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया सुरु असलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पाडणे शक्य होणार नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार पावसाळयाच्या हंगामात सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याबाबत शासनास अधिकार आहे. ही बाब विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

राज्यात सद्यस्थितीत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेले जनजीवन व वाहतूक व्यवस्था पूर्वपदावर येण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन ज्या प्रकरणी मा. सर्वोच्च/ मा. उच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी

Scanned with OKEN Scanner

संस्थांच्या निवडणूका (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) या आदेशाच्या दिनांकापासून ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

तथापि, सदर आदेशातून खालील बाबींना सुट देण्यात येत आहे.

१. संस्थेच्या निवडणूकीनंतर पहिली पदाधिकारी निवड करणे.

२. चेअरमन/ व्हा. चेअरमन/ अन्य पदाधिकारी पदाचा राजीनामा दिल्यास अथवा मृत्यु/ अनर्हता या कारणांमुळे रिक्त झालेले चेअरमन/ व्हा. चेअरमन/ अन्य पदाधिकारी यांची निवड करणे.

३. राजीनामा/ मृत्यु/ अनर्हता या कारणांमुळे संचालक मंडळातील रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकाची स्वीकृतीने निवड करणे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०९३०१८४४५९३५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=ca78467bcc4594e1e11741a7962a7a83feafb176442575037160fc343c4ae5ab, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E52439642AB57C33282A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2025.09.30 18:46:37 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. विभागीय सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक/ उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. निवडनस्ती, कार्यासन १३-स



Scanned with OKEN Scanner